# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** हुडकेश्वर पोलीस स्टेशन रोड ते अमरनगर रोड येथे २०० मी.मी.
**{सार्व.आरो.अभि. विभाग}** व्यासाची HDPE पाईप लाईन टाकणे.

उपरोक्त कामाची निविदा बोलाविली असता या कामाकरीता पाच (५) निविदाकारांनी भाग घेतला होता. त्यापैकी मे. निखिल कंस्ट्रक्शन यांची निविदा प्राकलन दरापेक्षा १४.७०% कमी दराची असुन त्याची राशी रू. २७,४९,२५०/- आहे. या निविदेला मा. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त आहे. करिता रू. २७,४९,२५०/- व त्यावर १८% GST रू. ४,९४,८६५/- असे एकूण रू. ३२,४४,११५/- च्या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप :- १. सविस्तर टिपणी नस्तीत संलग्न आहे.
२. सदर खर्च पद क्र. A४३८०१७४०७०१ मधून करण्यात येईल.

## <u>पारीत ठराव</u>

**ठराव क्रमांक :- 256/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 08/02/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (प्रकल्प), सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार हुडकेश्वर पोलीस स्टेशन रोड ते अमरनगर रोड येथे २०० मी.मी. व्यासाची HDPE पाईप लाईन टाकणे.

उपरोक्त कामाची निविदा बोलाविली असता या कामाकरीता पाच (५) निविदाकारांनी भाग घेतला होता. त्यापैकी मे. निखिल कंस्ट्रक्शन यांची निविदा प्राकलन दरापेक्षा १४.७०% कमी दराची असुन त्याची राशी रू. २७,४९,२५०/- आहे. या निविदेला मा. आयुक्त यांची मंजुरी प्राप्त आहे. करिता रू. २७,४९,२५०/- व त्यावर १८% GST रू. ४,९४,८६५/- असे एकूण रू. ३२,४४,११५/- च्या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**